# अनावर मना

(मिश्र कवितासंग्रह - भाग ४)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**अनावर मना** (मिश्र कवितासंग्रह – भाग ४)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई – ४०० ०३०.
भ्रमणध्वनी – ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट–२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे – ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १–एन, सेक्टर ए, एन–१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर – ४३१००३.
भ्रमणध्वनी – ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-988171-7-4

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/–**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

प्रत्येक कविता लिहिताना मी शब्दांशी नव्हे, माझ्याच मनाशी संवाद साधते. कधी काही शब्द सहजच ओघळतात जणू ते आधीपासूनच माझ्या अंतःकरणात झोपलेले असतात, आणि योग्य क्षणी जागे होतात.

'अनावर मना' हा माझ्या अशाच जागृत क्षणांचा संग्रह आहे. हे पुस्तक माझं मन आहे, ते कधी अस्वस्थ, कधी शांत, कधी रडतं, कधी हसतं. कधी स्वतःला शोधतं, कधी स्वतःलाच हरवतं. या प्रत्येक कवितेत माझ्या आयुष्यातील काही क्षण दडलेले आहेत, जेव्हा मी काही गमावलं, जेव्हा मी काही शिकलं, जेव्हा मी स्वतःला नव्याने ओळखलं.

'अनावर मना' या नावात माझा आत्मा आहे. कारण माझं मन खरोखरच अनावर आहे. ते थांबत नाही, ते विचार करतं, भटकतं, प्रेम करतं, प्रश्न विचारतं. ते कधी देवाशी बोलतं, कधी स्वतःवर रागावून घेतं. या सगळ्या भावनांचे प्रतिबिंब म्हणजे या कविता.

माझ्या कवितांत विषयांचं बंधन नाही. त्या कधी निसर्गाच्या कुशीत बसतात, कधी जगाच्या प्रश्नांत हरवतात. कधी आईसारखं ममत्व प्रकट करतात, कधी बालमनासारखं निरागस होतं. कधी त्या समाजावर विचार करतात, कधी फक्त मनाच्या कुजबुजीत हरवून जातात. पण त्या सर्वांत एक गोष्ट समान आहे, प्रामाणिकपणा.

मी कविता लिहिताना वाचकांसाठी नाही लिहित, मी लिहिते कारण मनात काहीतरी उसळतं. ते आवरत नाही. तेच 'अनावर मना.' म्हणूनच प्रत्येक ओळीमध्ये मनाचा एक स्पर्श आहे, आत्म्याचा एक श्वास आहे.

या संग्रहातील प्रत्येक कविता म्हणजे माझ्या मनाचा आरसा आहे. त्यात काही सुंदर, काही वेदनादायी, काही आशावादी प्रतिबिंब दिसतील. काही कविता वाचकांच्या डोळ्यात पाणी आणतील, काही ओठांवर स्मित देऊन जातील. पण त्या सगळ्या वाचकाच्या मनात उतरण्यासाठी जन्माला आल्या आहेत. माझ्या लेखनप्रवासात मला जाणवतं की, कविता ही फक्त शब्दांची बांधणी नाही, ती

आत्म्याची अभिव्यक्ती आहे. शब्द म्हणजे फक्त माध्यम. भावना म्हणजे मूळ. कविता म्हणजे त्या भावनांचा नाद.

'अनावर मना' लिहिताना माझ्या मनाने स्वतःला कधी थांबवलं नाही. मी मनाला स्वैर मोकळं सोडलं. ते जिथं नेईल, तिथं शब्द गेले. कधी ते प्रेमाकडे वळले, कधी हरवलेल्या आठवणींकडे, कधी नव्या स्वप्नांकडे. पण प्रत्येकवेळी ते मला नव्याने ओळख करून देत गेले. या पुस्तकाचं प्रत्येक पान म्हणजे मनाचा श्वास आहे. ते वाचताना जर तुम्हाला तुमच्या मनाची धडधड ऐकू आली तर समजा, माझं लेखन सार्थ ठरलं.

'अनावर मना' हा माझ्यासाठी फक्त एक संग्रह नाही तो माझा आत्मसंवाद आहे. मी माझ्या मनाला शब्द दिले आणि त्या शब्दांनी मला पुन्हा मन दिलं.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

कविता ही मनाची ओघवती भाषा असते; शब्दांतून वाहणारी, पण शब्दांच्या पलीकडे जाऊन काहीतरी सांगणारी. काही जण कविता लिहितात, काही जण कविता जगतात आणि काही दुर्मिळ आत्मे असे असतात, जे कविता बनतातच. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या लेखणीतून उमटलेला 'अनावर मना' हा संग्रह म्हणजे अशा एका कवितामय आत्म्याचा प्रवास आहे. जिथे शब्द मनाला धरून ठेवू शकत नाहीत, आणि भावना मर्यादांच्या काठावरून ओसंडून बाहेर पडतात.

'अनावर मना' हे शीर्षकच जणू सगळं काही सांगून जातं. मनाला कोणताही आवर नाही, शब्दांना कोणतीही भीती नाही आणि भावनांना कोणतंही बंधन नाही. ही कवयित्री मनाच्या प्रत्येक कोपऱ्यातील कुजबुज ऐकते आणि त्या कुजबुजेला शब्दांचा आकार देते. ही कविता म्हणजे शिस्तीत अडकलेला साहित्यिक प्रयोग नाही, तर मनाच्या बेभान लहरींचा निखळ, निर्मळ प्रवाह आहे.

या संग्रहातील कविता वाचताना कुठे तरी विंदा करंदीकरांच्या 'अवकाशा'चा आत्मगंध जाणवतो, पु.ल. देशपांडे यांच्या माणुसकीचा उबदार श्वास ऐकू येतो, व.पु. काळे यांच्या नातेसंबंधातील आत्मीयता डोकावते आणि ना.सि.फडके यांचा सहजपणा, त्यांचा शब्दांतील आर्त भाव या कवितांतून पुन्हा पुन्हा साकारतो. कवयित्रीची शब्दभाषा अभिजात आहे, पण अहंकाररहित आहे. ती साधेपणातली सौंदर्यदृष्टी ओळखते. कधी एकटेपणाचा हात धरून ती चालते, कधी बालपणाच्या गंधाने न्हाऊन निघते, कधी आयुष्याच्या वादळातही हसण्याचे कारण शोधते.

'अनावर मना' वाचताना वाटतं, आपण सगळे तिच्या मनाच्या त्या वाटांवरून चालतो आहोत, जिथे कधी अंतर्मनातील वेदना कुजबुजते, तर कधी नव्या आशेचा सूर्य उगवतो.

या संग्रहात कवयित्रीचं मन, कधी स्वतःशी संवाद करतं, कधी देवाशी, कधी समाजाशी. कधी ते रडतं, पण रडण्यातही एक सौंदर्य आहे. या कविता म्हणजे आयुष्याच्या लयीवर नाचणारे विचार. प्रत्येक ओळीमध्ये एक गंध आहे; कधी मातीतला, कधी मनातला, कधी अक्षरातला. कवयित्रीचा हा प्रवास केवळ सर्जनशील नाही, तर आध्यात्मिक आहे. तिच्या कवितांमध्ये दैनंदिन जीवनाच्या छोट्या क्षणांना कवितेच्या माळेत ओवलेलं पाहायला मिळतं. जणू जीवनाच्या धावत्या प्रवाहात ती म्हणते.

'थांब, एक क्षण... ऐक मनाचं बोलणं.

शब्द नाही, भावना ऐक.'

'अनावर मना' हा संग्रह त्या भावनांचा साक्षी आहे, ज्या ओघळतात. नजरेतून, श्वासातून, आणि कधी कधी शब्दांतूनही. ही कवयित्री कविता लिहित नाही, ती शब्दांना श्वास देते. तिच्या ओळींमध्ये आत्म्याची लय आहे. तिच्या कवितेतून स्त्रीमनाचा कोमल स्पर्श आहे, पण त्यात कमकुवतपणा नाही. त्यात ताकद आहे, जीवनाचे तत्त्वज्ञान आहे, आणि माणसाची करुणा आहे. या कवितासंग्रहाचा आस्वाद घेताना वाचकाला वाटतं हे मन माझंच आहे! तेच कदाचित या लेखणीचं सर्वात मोठं यश आहे.

'अनावर मना' वाचून झाल्यावर वाचकाच्या हृदयात एक शांत भावनारंध्र तयार होतो. जिथे शब्द नाहीत, फक्त भावनांचा ओघ आहे. त्या ओघात डोळ्यांत थेंब येतात, पण ओठांवर हसूही उमटतं. हीच खरी कविता जी अंतःकरणाला हलवते, पण भारावून सोडते. साहित्यविश्वात 'अनावर मना' हे एक स्मरणीय पाऊल आहे; ते केवळ एक पुस्तक नाही, तर मनाचा साक्षात्कार आहे.

**डॉ. आर. व्ही. शास्त्री**
वरळी, मुंबई

# अनुक्रमणिका


१) क्षण कोरुनी ते घ्यावे ... ११
२) मधुर मधुरतम माधुर्याची ... १२
३) बगळ्या बगळ्या कवडी दे... १३
४) मापात माप ... १४
५) थांब जरा तू राजा वरुणा ... १५
६) हृदय वाहिले आहे ... १६
७) हरित दुलई जी अंथरलेली... १७
८) भीज पावसाची ... १८
९) पाऊस म्हणजे गूज जीवाचे... १९
१०) मनातला मोरपीस ... २०
११) काळजाचे पिकलेत
ओलसर गरे ... २१
१२) जावळाचे शेत ... २२
१३) पाऊस हा दुराव्याची
दोर कशी तोडी ... २३
१४) बकुळफुलांनो
जाणून घ्यावे ... २४
१५) पाऊस वेडा वागे ... २५
१६) गत आहारी आहे
अवस ही ... २६
१७) दडून बसल्या
माशीलाही ... २७
१८) हे शिवा शंभो रे ... २८
१९) शिकणं ग जरुरी ... २९
२०) आता नव्याने
भातुकलीची ... ३०
२१) भरले केळीचे पान ... ३१
२२) एक गुलाब जो ... ३२
२३) दाराशी निशिगंध ... ३३
२४) वाट कुणाची
पाहते धरणी ... ३४
२५) जरा वळून पहावे ... ३५
२६) देव भेटता जन्म सार्थकी ... ३६
२७) मोरपीस ... ३७
२८) कविता अळवासारखी ... ३८
२९) अत्तर फाया मनी राहणे ... ३९
३०) पुनव मनात विराळी ... ४०
३१) नवी मंजूषा उघडे ... ४१
३२) चांदण्यांची ओंजळ ... ४२
३३) आनंदाचा कोळ ... ४३
३४) चिंब ओल्या वाटेवरती ... ४४
३५) बरवा श्रावण जन्मला ... ४५
३६) मोहनाचे वेड ते ... ४६
३७) कृष्णमय हो राधिका ... ४७
३८) कृष्णबाळा मोह चाळा ... ४८
३९) श्रीहरी रे श्रीहरी ... ४९
४०) स्मरता कमला
वा उमाकांत ... ५०
४१) भरलेल्या मेघांची तोरणे ... ५१
४२) अनुबंध मग तिथले ... ५२
४३) माहेर जिवंत अंतःकरणी ... ५३
४४) ती शुभांगी पुष्पिका ... ५४
४५) कमल ताटव्यांच्या गुलाबी... ५५
४६) रानात राजा राबाया ये तर... ५६
४७) वर्षाराणीचे चित्र मोहक ... ५७
४८) मंजुवेणु स्वरबंध ... ५८
४९) हात कुणाचे स्वर्णिम
झाले असतील ... ५९

५०) ये ये गणेशा तू मंगलमूर्ती... ६०
५१) पार्वतीचा बाळ मी ... ६१
५२) गुणपती गणपती ... ६२
५३) घ्यावी मानून सेवा माझी ... ६३
५४) महालक्ष्मी माऊली ... ६४
५५) सोन्या रूप्याच्या पाऊली... ६६
५६) महालक्ष्मी तू ... ६८
५७) हे गणेशा आशीषा दे ... ६९
५८) विघ्ने सत्वर ताराया ... ७०
५९) ओंकारा आदि स्वरूपा ... ७१
६०) आशीष देतो आधी ... ७२
६१) हिंदोळ्यावर
कधी सुखाच्या ... ७३
६२) असे मुलायम कोडे पडता... ७४
६३) तशीच तुझी नि
माझी प्रीती ... ७५
६४) आठव येते पाठव त्याला... ७६
६५) भारती तू जग जननी ... ७७
६६) गोकर्णाच्या
निळ्या जांभळ्या ... ७८
६७) रंग भरून संगाने ... ७९
६८) गुच्छ मोहिनी ... ८०
६९) एक मन हरवून जाता ... ८१
७०) भाळणे भाव पाळणे ... ८२

## (१)
## क्षण कोरुनी ते घ्यावे

काल जे घडले घडून गेले
परत आणणे नाही
आठवणींच्या पेटाऱ्यातुन
स्मृती खुणावती काही


नकळत कैसे कधी वागतो
कळते मग तो उशीर
वळते आता असे वाटते
काळ ठरतो सुवीर

रेषा रेषा पटलावरच्या
पुसटशा काही गडद
जे गेले ते कवटाळू की
हाती जे आज ते वद

काल कालचे गुडूप गुहेतून
उद्या न माहीत काय
आज व्यर्थ का दवडून द्यावा
पुन्हा काल होत जाय

क्षणाक्षणाला क्षण ओघळती
क्षणात जगता यावे
क्षणभर क्षण ना थांबे कधीही
क्षण कोरुनी ते घ्यावे

दि.२०/०७/२०२४
सकाळी ०९.२९ वा.




## (२)
## मधुर मधुरतम माधुर्याची

ओथंबुन मग येणे म्हणजे
प्रपात पहावे होऊन
वर्षा होता प्रीतीभरली
मस्त घ्यावे की न्हाऊन


सोडून द्यावे झोकून थोडे
स्वतःस उंचावरुनी
खळखळ अवखळ भावप्रवाह ते
मुक्त मोकळे करुनी

रूप वेगळे स्वरूप होते
निजरूपाची गोडी
अनुरागाची सृष्टी फुलता
लाली उमटते थोडी

मधुर मधुरतम माधुर्याची
ओढ जिवा मग लागे
मन हे वेडे अजून थोडे
वेड्यासम का वागे

क्षणात विरतील ताप युगाचे
पुण्य फळाला येईल
सुखद क्षणांची रेलचेल मग
सुखासुखी बघ होईल
सखया, सुखासुखी बघ होईल

दि.२२/०७/२०२४
रात्री ११.२२ वा.



## (३)
## बगळ्या बगळ्या कवडी दे

या बगळ्यांच्या झाडाला म्हणे
जाग नवी आली
तांबडे फुटता आकाशाला
उषा उतरली खाली

माना वळवून अंदाजांच्या
सीमा बांधल्या जातील
पंखांवरल्या कोरीवतेतून
दिशा टांगल्या जातील

सांज असो की सकाळ आता
रंग ढवळा बगळ्यांचा
त्यावर पडतील किरण सोनेरी
तरी संग ढवळा बगळ्यांचा

मुश्कील बगळे मिश्किल बगळे
सोंग ढोंग बगळ्यांचे
रंग धवल परी कृष्ण काळीजे
पोंग बोंग बगळ्यांचे

असले तापस किती चालायचे
कळेल एकदा सारे
अन बगळ्यांचे खरे रंग मग
दाखवून देईल वारे

तोवर चालो तुमची शाळा
बगळ्या बगळ्या कवडी दे
जगताना तू एक तरी मग
सच्चाईची दमडी दे

दि.२३/०७/२०२४
सकाळी ०९.१२ वा.




## (४)
## मापात माप

चिळवं निळवं कोळवं
चिपटं मापटं शेर
आडसरी अन् पायली
मोजमाप आहेर

असू दे लहान की मोठं
मोजून घेणं घ्या
ज्याचे देणे लागे
त्याचे त्याला द्या

पिकवून आली धान्ये
धन्यास मोजमाप करणं
तोलून मापून सारं
गोण्या नि कणग्यात भरणं

लक्षुमी भरली मापट्यात
मापंच वलांडती ती
पोटाची खळगी भुकेची भूक
भरून वसांडती ती

साठवा पाठवा आठवा
की राब राब राबून पिकवा
मापात गोडी त्याला न तोडी
टाकून नको पण भजून माजवा

मापात पाप कधीच नको
पापात माप ही नको
पापच नको तर पुण्य हवं
तिथं मग मोजून असो

दि.२४/०७/२०२४
सकाळी ०९.५४ वा.



**(५)**

**थांब जरा तू राजा वरुणा**

सरीत सर मिसळुनी ती झरते
झरझर पाऊसधारा
पिसाट होतो बेकाबू का
बेभान तुफानी वारा

मनात पाऊस भीती ओलसर
गुडूप घरातून होणे
कुठे पुराच्या धोक्यापायी
पाय माघारी घेणे

कडकड कडकड विजा चमकती
काळोखात दामिनी
रुद्र भयानक वाटून जाते
मुसळधार यामिनी

काय ठरविले आभाळाने
जलमय सृष्टी व्हावी
पाणी पाणी जिकडेतिकडे
आणीबाणी कळावी

थांब जरा तू राजा वरुणा
बरसत किती रे राहशील
जीव टांगणी नदी अंगणी
अंत कितीसा पाहशील

दि २५/०७/२०२४
सकाळी ०९.१६ वा.




(६)

## हृदय वाहिले आहे

किती रंगशील रंगामध्ये
राधे श्रीरंगाच्या
कथा आपुल्या होतील गाथा
अमर प्रीत संगाच्या


एक छेडिली तार सुराने
धुंद मग्न तू झाली
धावत सखये माझ्यासाठी
आतुरतेने आली

सप्तसुरांच्या सीमा आपुल्या
प्रीतरागिणीला ना
वेणु हसते अधरी बसते
राधाकृष्ण मधुलीला

चंद्र खुलावा तू मी असता
चांदण्यात रोहिणी
कशास मिटशी नयन बोलके
मंजु मधुर मोहिनी

क्षण हे सुंदर मन अपरंपर
हृदय वाहिले आहे
राधा पाहते कृष्ण उरातून
कृष्ण राधेला पाहे

दि.२५/०७/२०२४
सकाळी ११.२९ वा.



आकाशाच्या फिकट निळ्याशा
छत्रीने उघडता
रंगसंगती सुरम्य सुंदर
अवकाशातून घडता

पायवाट काढुनी वाटुली
धुंद चालून जाते
मनात आपुले सूर छेडूनी
गाणे पोपटी गाते

## (७)
## हरित दुलई जी अंथरलेली

हरित दुलई जी अंथरलेली
भुई नटून नटवरली
हलक्या हवेच्या झुळूकेसंगे
फुले सान डवरली

उभ्या उंच तरुतळी मखमली
हिरवाई पसरता
त्यावर छाया गडद सांडते
भान सृष्टी विसरता

तशात उडती फूलपाखरे
मधु भक्षण करण्याला
गंध सुगंध नि परागकण ते
जीवनात भरण्याला

सजली धजली सृष्टी सुंदर
रूप नवे साजिरे
कसे विसरावे नभ सखयाने
तिचे हास्य गोजिरे

दि.२६/०७/२०२४
सकाळी ०८.४६ वा.



## (८)
## भीज पावसाची

भीज पावसाची शीतल शहाऱ्याची
धुंद राहण्याची ही संगती अशी
गाभुळला ऋतू जाई उतू उतू
भावनांची हुतुतू संमती कशी

धुरव्यात धुकं काळजाचं ठोकं
बधिरलं अंग अंग दंग होत बसं
नजरेत लाज तिचा दाटलाय साज
कोपऱ्यात डोळ्याच्या अलवार हसं

छत्रीत एका, बिलगून एकमेका
तुझ्या माझ्या भावनांचा,
उंच उंच झोका
जरा जरा थांब, जाऊ दोघे लांब लांब
बरसात प्रीतधारा, मधुरसा मोका

दिनरात हवा, आशा पाखरांचा थवा
बेहोशीचा नवा, रंग सांग सख्या मला
काय तू बोलावे, काय मी सांगावे
शब्देवीण गूज माझे, कळावे की तुला

ऋतू पांघरावा, थंड तुषार फवारा
अत्तराचा फाया, उडे मातीतून सारा
टवटवी फुलवीत, आली नाचत उडत
बावरून गेली की ही वर्षाव धारा

दि.२७/०७/२०२४
सकाळी ०८.२१ वा.



## (९)
## पाऊस म्हणजे गूज जीवाचे

अशा उडाल्या छत्र्या रंगीत
नाचत आकाशात
इंद्रधनुचे रंग सांडले
धूसर प्रकाशात

रंग बरसले अवनीवरती
उत्साहाचे सात
गेली मरगळ नभांगणाने
धरला धरणी हात

हासू फुटले खुदकन जलदा
हास्य धबधबे फार
अवकाशाचे आनंदून मग
पदर शहारले चार

झाडांवरती मुग्ध पल्लवी
वसने खुललेली
जलधारांच्या लाडिक नादे
सृष्टी भुललेली

धुतल्या रस्त्यावरून धुतले
स्वप्न जरा मळलेले
पाऊस म्हणजे गूज जीवाचे
जीवास ते कळलेले

दि.२८/०७/२०२४
सकाळी १०.३२ वा.



## (१०)
## मनातला मोरपीस

मनातला मोरपीस फिरतो कसा
श्रीरंग मनी माझ्या उरतो तसा
भाव माझे प्रीतीतले अति अलवार
अनुभव घेत जाशी अति हळुवार


आठवांच्या हिंदोळ्याला उंच उंच झूल
तशी तुला पडते ना माझी सख्या भूल
हाती माझा हात येता हरखून जाशी
नदीकाठी गाव एक नव्याने पाहशी

आता हवा अलगद आल्हाद देते ना
बोल माझे मंजु वेणु प्रल्हाद देते ना
मन माझे मोरपीस फिरे काळजात
कसे कुठे जुळविले धागे या जगात

हरवले क्षण आता शोधावे तू इथे
हाक जिथे मारशील पहा मला तिथे
जन्म फिका रिकामासा जातो का वहात
क्षण एक युग देतो अंतरी रहात

बरसात तुझ्यावर भाव भरलेली
भेट होती आपली का कधी ठरलेली
आता एकरूप व्हावे जगणेच सारे
हवे तसे वहावेत नशिबाचे वारे

दि.२९/०७/२०२४
सायं. ०५.२७ वा.



## (११)
## काळजाचे पिकलेत ओलसर गरे

डोंगराला जाग आली वाहतात झरे
काळजाचे पिकलेत ओलसर गरे


टणकशा देहावर पावसाचा शेला
मनातुन पर्वत ढगातचि गेला

आली बागडत कशी मिठीतुन राणी
पावसाची कानामध्ये त्याच्या गात गाणी

कोणी कसे फिरकेना उन्हाच्या झळात
एकटाच डोंगुर हा विराण काळात

आता सुखे अंग त्याचे मोहरून गेले
पांग फिटताना डोळे भरभरून आले

दि.२९/०७/२०२४
सकाळी ०८.३१ वा.



## (१२)
## जावळाचे शेत

जावळाचे शेत उगवून किती डोले
पावसाच्या संगतीने हिरवाई बोले

आकाशाला टेकायचे मनी रोपट्याच्या
जमिनीशी नाळ मुळे बांधलीत त्याच्या

मधे वारा खेळवितो पाळण्यात बाळं
कवळ्याशा अंकुरांचे तान्हुले की चाळं

हसतात बोलतात खेळतात रोपं
पावसात जगायाचं आहे किती सोपं

नको दडी मारू बाबा हिरमुसतील
सुकूनिया पात्या रडू मुसमुसतील

दि.३०/०७/२०२४
सकाळी ०७.३८ वा.



## (१३)
## पाऊस हा दुराव्याची
## दोर कशी तोडी

भिजलेल्या पंखातली झेप ओली ओली
उंच आकाशात जाता काळजाची खोली

मेघ वाहतात किती जळांच्या पखाली
बरसून हलकेसे वारे कोण घाली

घरट्यात कोण आहे चिवचिवणारे
चारा ओला माया ओली डोळे दिपणारे

काडी काडी घर माडी मन मन जोडी
पाऊस हा दुराव्याची दोर कशी तोडी

उघडून खिडकीशी विसाव्या पहावे
आत ऊबदार पावसाळ्यात रहावे

दि.३१/०७/ २०२४
सकाळी ०९.२० वा.



## (१४)
## बकुळफुलांनो जाणून घ्यावे

बकुळफुलांनो जाणून घ्यावे
हळवे माझे मन
सुगंध भरला जसा मोहवी
मोहे तन कण कण

उपवन फिरता दिसता तुम्ही
हासत उमलून आल्या
सांगा पाहू काय मनीच्या
आठव जाग्या झाल्या

कुठे कुणी तो मनात बसला
दिसला की नाही ग
म्हणून मनातून अलगद डोळे
मिटून तया पाही ग

उमलून येणे दुजियांसाठी
फुलणे तसेच असते
स्वतःसाठी कधीच आपुले
जगणे का ग नसते

कधी कुणी का घेईल समजून
आपुला तो होताना
येईल का मग काळजातची
कुठेच न जाताना

दि.०२/०८/२०२४
रात्री ११.३२ वा.



## (१५)
## पाऊस वेडा वागे

मीऽऽ तूऽऽ पाऊस छत्री
आठवले ना काही
कधीकाळचा पाऊस वेडा
अजून मनात राही

सरी ओघळल्या लाजलाजुनी
अंगावरती शहारा
तशात छेडीत खोडी काढतो
मस्त धुंदला वारा

पानोपानी राग पसरला
मल्हाराचा मधुरसा
धुक्यात हरवून जाते सकाळ ही
रस्ता रोजचा दूरसा

ओल्या ओल्या मातीमधल्या
अत्तरदाण्या खुलल्या
कुठे लाजवंतीच्या गाली
मीलन कलिका फुलल्या

येतो पाऊस गवाक्ष साक्षी
ओघळते ना वर्षा
आसुसलेले जीव भेटता
किती उत्सुकता स्पर्शा

मनात माझ्या अजूनही तो
पाऊस वेडा वागे
आठवणींनी पुन्हा नव्याने
प्रीत मनातून जागे

दि.०३/०८/२०२४
दुपारी १२.३१ वा.



## (१६)
## गत आहारी आहे अवस ही

गत आहारी आहे अवस ही
नाही गटारी बंधू
जपणे आपणा मिळुनी सर्वां
संस्कृतीचा निज सिंधू

आनंदाच्या कारणासाठी
कधी दुःखाला विसरणे
म्हणून मद्या करिशी सेवन
पुरुषा बरे न घसरणे


गत आहारी आहे अमावस
नाही गटारी काही
व्रत वैकल्ये श्रावणातली
तशा आहारा पाही

एक पणती तू हिंदुत्वाची
जर हाताने उजळशील
स्त्रीसवे मग पुरुषांचीही
व्रत वैकल्ये फळतील

नसला प्रकाश जरी चंद्राचा
दीप उजळुनी द्यावे
आयुष्याच्या अंधारातही
पणती होत जळावे

सांगे दिव्यांची आवस ऐकू
संदेशा मौलिक
भारतीय संस्कृती जगातून
आहे किती अलौकिक

दि०३/०८/२०२४
सायं. ०७.३३ वा.



## (१७)
## दडून बसल्या माशीलाही

दडून बसल्या माशीलाही
गंध गुलाबी खुणावे
स्पर्श गुलाबी अत्तरतनुचे
मोद तिचाही दुनावे

कधी न मिळाले इतुके सुंदर
बसण्या आसन तिजला
गलिच्छतेच्या साम्राज्याविन
महाल गुलाबी सजला

तिथली गुंऽऽई गुंऽऽई
नको नकोशी घाणीतली का वाटे
इथे तियेचे मनही नितळसे
गुंजारवास दाटे

म्हणून थोडी दडून बसली
पाकळीत लपताना
आज तिच्या का मनास लाभे
समाधान छपताना

एक वाटले तिला परंतु
रंग गुलाबी यावा
तनास तैसा मनासही तो
अलगद लपटून जावा

माशी शिंकली असे न होवो
नासिकेस ती वदली
आता माशी पंख गुलाबी
घेऊन गगनी चढली

दि.०५/०८/२०२४
सकाळी ०९.४५ वा.



## (१८)
## हे शिवा शंभो रे

हे शिवा शंभो रे कृपा राहू दे
उभयतांवरी तुझी सदा
सदाशिवा हे नीलकंठ
शंकरा उमापते वरदे सदा

रुद्र काल महेश्वरा त्रिनेत्रा
महाकाल सर्वविग्रहा
मंजुनाथ शिवावरा गंगाधरा
पावशी त्वरा ईश पापहा

घे दुग्धाचा अभिषेक हा
जलधारांची भक्ती
युगुल आम्ही हे पुजतो तुजला
बिल्वदलांची शक्ती

शिवनामाचा जप चालतो
श्रावण पावन आला
नमन तुला हे जटाधरा भवा
शर्वा गिरीशा माला

जशी शिवानी तुझी अर्धांगिनी
प्रिया माझी ही आहे
तिजविण शिव तू शव जो होशी
शक्ती माझी ही राहे

अभेद्य नाते अजोड तनमन
नित्य साधना चाले
हे आत्मिक रे शम्भो शंकरा
आराधित क्षण झाले

दि.०६/०८/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (१९)
## शिकणं ग जरुरी

गुलू गुलू तुझे गूज माझे गूज हवे
काय बर मोबाईल मधे नवे नवे

हात त्याला लावताच काही उघडतं
लगेचच कळतं कुठे काय घडतं

रील, व्हिडीओ वाटे सारखेच पहावे
मन आपुले ग मैत्रिणी इथं रहावे

काहीतरी गुपचूप अळीमिळी चिडीचूप
उगाचच वेळ किती घालवतो खूप खूप

इथं बसलो तरी जगाचीच सैर की
आई बाबा संगे फुकटचे वैर की

नको नको डोकं इथं लावायला जास्त
शिकणं ग जरुरी, जगणं ते रास्त

दि.०७/०८/२०२४
सायं. ०६.५३ वा.




## (२०)
## आता नव्याने भातुकलीची

इवली इवली भातुकली अन्?
इवले इवले सारे
इवल्या इवल्या हातांवरती
जग इवलेसे न्यारे

चूल इवलुशी न पेटवता
ऊब केवढी देते
वरण भात पोळी भाजी
सारे शिजवून देते

पाटावरती प्रेम बसवुनी
माया खाऊ घाले
घासामधले घास भरवता
लळा जिव्हाळा चाले

बालपणीचे असे सोहळे
डोळे माझे ओले
खऱ्या संसारी डोकावून ती
भातुकली मज बोले

तसेच राहो निरागसाचे
जगणे सुंदर राणी
राजा खोटा घरकुल खोटे
खरी प्रीतीची गाणी

ऐक सांगते पुन्हा मांड तू
भातुकलीची कहाणी
नकोच आणूस अवखळ डोळा
पुन्हा कधीही पाणी

हसली भांडी हसला खेळही
हसला तो थाट माट
आता नव्याने भातुकलीची
पुन्हा चालते वाट
मधुरशी पुन्हा चालते वाट

दि.०८/०८/२०२४
सकाळी ०७.३८ वा.



## (२१)
## भरले केळीचे पान

श्रावण सुरू झाला की
नैवेद्याची लगबग
सुग्रास अन्नाचे सुवास
भरले केळीचे पान बघ

लवण चवीचे लिंब फोड
लोणचं चटण्या ओल्या सुक्या
कोशिंबिरी भरड डाळी
पातळभाज्या फोडभाज्या

पापड कुरकुर कुर्वडया
चमचमीत भजे भरडा
पुरी भाजी सातळ उसळ
कढी आमटी डाळवडा

खीर बासुंदी करंजी बुंदी
साखरभाताची गोडी
लाडू वाढू पुरणपोळी
रवाळ तुपाची तिज जोडी

वरण भात साजुक तूप
मसाले भात रोचक खूप
दहीभात शेवटी घ्या
खुलून येईल आपलेच रूप

धूप दीप ओवाळून घ्या
नैवेद्य देवांसी द्या
पोटभर मग पोटपूजा
यथेच्छ ते ते खाऊन घ्या

शेवटी तांबूल मुखशुद्धी
गोविंदविडा ठेवा तबकी
गप्पाटप्पा चालू द्या
एक मधुरशी मग डुलकी

दि.०९/०८/२०२४
रात्री ११.३९ वा.



## (२२)
## एक गुलाब जो

गुलाब भिजला दवबिंदूंनी
थरारल्या पाकळ्या
रंग खुलावा इतुका सुंदर
नाजुकशा ग कळ्या

वर्षाराणी भिजवीत जाते
चिंब रानावना
बहर खेळवी ऋतू गंधाचे
भुरळ वेडी मना

जरी काट्यांवर जगणे आहे
पहा गुलाबाचे
हासत रहाणे उमलत जाणे
धुंद गुलाबाचे

हिरव्या कऱ्या पानांवरती
हिरवाई मांडली
अत्तर कुपी ही दरवळलेली
कुणी कधी सांडली

एक गुलाब जो तुझ्या नि माझ्या
काळजात राहिला
किंचित लाजून खळाळलेला
तेंव्हा मी तो पाहिला

तू मी, मी तू, गुलाब संगे
मंद्र चांदणे होते
तुझे नि माझे हृदय जोडले
उधाणलेले होते

दि.१०/०८/२०२४
संध्याकाळी ०५.३४ वा.



## (२३)
## दाराशी निशिगंध

काय सांगतो उमलून आला
दाराशी निशिगंध
रोज रातीला प्रीत उमलू दे
गंध देत मधुछंद

हलक्या हलक्या झुळुकेसंगे
डोलत तो जातो
एक राग अनुराग मनातून
सांजेला गातो


काही उमलती कळ्या फुलूनी
काही अर्धोन्मीलित
मिचमिचणाऱ्या डोळ्यांनी त्या
ताज्या उत्फुल्लित

वाट पाहतो दाराशी का
उभा स्तब्ध राही
सुगंधात नाहलेत गुपचूप
गूज त्याच्या काही

आठवणींच्या तिन्ही सांजेला
रात उंबऱ्यात
सरता सरता पहाट येईल
झुलत अंबरात

तरीही मनातुन डोलत राहील
निशीगंध माझ्या
कथा दरवळतील तुझ्या नि माझ्या
मधुर मीलनाच्या

दि.११/०८/२०२४
दुपारी ०३.४७ वा.



## (२४)
## वाट कुणाची पाहते धरणी

पावसातली हिरवळ कवळी
छटा निराळ्या सुंदर
कसे मी रमते त्या रंगातून
मोद मिळे अपरंपर

कुणी निर्मिले रंग अनोखे
बहर बहरुनी येते
वसुंधरा का प्रिया मीलनी
अशी मोहरून येते

अंगावरती हिरवी वसने
हिरवा शालू नेसून
वाट कुणाची पाहते धरणी
सजून धजुनशी बैसून

अंगाखांद्यावरी तियेच्या
प्रेमांकुर रुजताना
प्रियतम वर्षावात सखी
बेधुंद अशी भिजताना

अधरांवरती गीत तियेच्या
आपसूक उमटून येते
भेट अनोखी वर्षा ऋतूची
नयना मिटून घेते
ती नयना मिटून घेते

दि.१२/०८/२०२४
रात्री ११.५७ वा.



## (२५)
## जरा वळून पहावे

खळखळ अवखळ पाणी ओघळे
नाव धबधबा त्याचे
जोश होश उल्हास कोसळे
पहा तुषार तयाचे


त्या पाण्याला वेग कुठूनसा
कुठून आवेगही तो
किती उंचावर असतानाही
पडतो प्रवेगही तो

एक ताल एक सूर उमटतो
जलधारांच्या नादे
रम्य निवांतशा रानीवनी मग
गीत तयाचे गाजे

कुणी कधीतरी येते पाहण्या
रूप तयाचे अनावर
कसा घालावा मनास बांध हो
कसा ठेवावा आवर

कधीतरी होऊन धबधबा
मुक्त कोसळून जावे
पडता पडता उगमस्थाना
जरा वळून पहावे

दि.१३/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.



## (२६)
## देव भेटता जन्म सार्थकी

मनास माझ्या सदाच वाटे
कुतूहल निर्मात्याचे
कुठून आणतो रंग एवढे
जगण्या कौतुक त्याचे


एक शोधण्या जन्म न पुरतो
तो तरी दशांगुळे उरतो
जरी फाटकी झोळी आपुली
सौंदर्याने भरतो

कुणी केली का अशी कल्पना
रंग छटा त्या निराळ्या
पोत निराळे स्पर्श जाणिवा
मनात उमलाव्या कळ्या

एक देह परी किती अनोखे
प्रत्येकाचे दिसणे
त्याहून कोडे आत मनातील
कसे कुणाचे असणे

उगाच वाटे हात तयाचे
एकदा स्पर्शून पहावे
देव भेटता जन्म सार्थकी
कणकण हर्षुन जावे

दि.१४/०८/२०२४
सकाळी ०७.३२ वा.



## (२७)
## मोरपीस

कधी कधी मनावर भावनेच्या
कुंचल्याचे मोरपीस फिरते ना
हळुवार मनास भावलेला श्याम
त्याच्या आठवणीत राधाही उरते ना

किती आणि कशा बरं पुसाव्यात
मनाच्या कोंदणातील स्मृतींच्या घुंगुरमाळा
त्यांना पुन्हा पुन्हा वर येत आठवांचे
डोंगर उभे करण्याचाच चाळा

नको तरी कसे म्हणावे की त्या
इतक्या हळुवार अलवार फिरतात
मनाच्या तळाशी खोल खोल कुठेतरी
कधीही न विसरण्यासाठीच उरतात

एकदा ठरवले अजिबात आठवायचे नाही
मनाला आता कधीही त्या जुन्या
साम्राज्यात पाठवायचे नाही
हळूच मनाने म्हटले, 'काय
मी आता मला भावले
तेही साठवायचे नाही?'

असे नको करुस ना म्हणत
मनाने मनानेच दडवून ठेवलेले
मोरपीस फिरवले
मी पुन्हा त्या स्मृतींच्या खेळात
सरलेल्या काळाला गिरवले

दि.१५/०८/२०२४
सकाळी ०६.५७ वा.



## (२८)
## कविता अळवासारखी

सुचली कविता अळवासारखी
हृदयाच्या पानावर
तिज सौंदर्ये काळीज खुलते
ना ये भानावर

तिज सांभाळून ठेवण्यासाठी
लगबग अंतःकरणी
ती तर कविता शब्दांमधुनी
भाव चंचल की हरणी

सरसर येते सर कवितेची
जरा विसावत हृदयी
पटकन घेते ठाव कविता
रसिकांच्या सहृदयी

खुणा तिच्या त्या दवांसारख्या
शोभवून मज जाती
नाव फुकाचे माझे करण्या
शब्दखुणा मज हाती

भाव बोलके संदेशांचे
रसिकवरांच्या गावी
शोधत रहाता माझी कविता
ती वाट वाचकां दावी

पुन्हा नव्याने रोज च येते
सर ही कविता होऊन
दवबिंदूंशी नाते जडते
शब्दार्थांना लेऊन

दि.१६/०८/२०२४
सकाळी ०९.१९ वा.



## (२९)
## अत्तर फाया मनी राहणे

दरवळ माझा सोनचाफी रे
परिमळ असू दे राऊळी
अंगणातल्या झाडाखाली
ओसरीवरल्या जागुली

सुगंध येईल घरभर सारा
असेल मी की नसेल रे
धुंद क्षणांच्या बरसातीने
कणकण बरसून बसेल रे

पहा तिथे त्या देवळीतल्या
कोपऱ्यात मी दडलेली
आठवेल का तुला सख्या रे
प्रीत सोनेरी घडलेली

हलकी हलकी आठवणींची
झुळुक सोनेरी येताना
सुरभित होईल जीवन सारे
सोनचाफी मी होताना

बघ ना तुजला जमेल का मग
अत्तर बनवून मज ठेवणे
क्षण एकाकी क्षण गजबजले
अत्तर फाया मनी राहणे

दि.१७/०८/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (३०)
## पुनव मनात विराळी

जळात पडल्या चांदोबाच्या
चांदण्याचे कौतुक
जळ ही होते चांदीसारखे
संगत शीतल आपसुक


चंचल चंचल लहरींवरती
लाट सुखाची येते
चांदण्यातल्या अलगदतेवर
हलके घेऊन जाते

ती झाडाची पहा डहाळी
कशास वाकून गेली
चांदण्यातली रात तिचीही
चांदणे माखून गेली

चंद्र कितीही करो कोंडाळे
चांदणे झिरपून जाते
खूण एक रात्रीस नभातून
हलके उतरुनी येते

तोच चंद्र अन्? तीच रागिणी
रोज कांती निराळी
मनास उधळून लावत जाते
पुनव मनात विराळी

दि.१८/०८/२०२४
सायं. ०६.१६ वा.



## (३१)
## नवी मंजूषा उघडे

प्रभातकिरणे डोकावली अन्?
लहर चैतन्य उठली
झाडे वेली पाना फुलांच्या
गावी वार्ता कुठली


चला चला की उषःकाल हा
आला आता आला
एक सुरेख हा दिन भेटाया
उत्सुक किती हो झाला

पुन्हा नव्याने श्वासांवरती
हक्क वाटतील आता
क्षणा क्षणांच्या खुणा सापडो
काळ ओलांडू जाता

झुळझुळ झुळझुळ सूर वाहती
हसरे प्रवाह खळखळ
आत उसळते जीवन ऐसे
रुधिर वाहते सळसळ

रंग नव्याने येती बिलगण्या
नवी मंजूषा उघडे
हरखून जावे अशी मधुरशी
पहाट सुंदर उघडे

दि.१९/०८/२०२४
सकाळी ०७.१२ वा.



## (३२)
## चांदण्यांची ओंजळ

उधळून चांदण्यांची
ओंजळ रीती करावी
हृदयात आकाशाची
व्यापकता की भरावी

येतील मेघ दाटुनी
बरसून जाती वा न वा
नुसत्याच फोल गर्जना
पाण्याची चाले वानवा


असले जरी तसेही
सांभाळुनी तयांना
जाते गगन पुढे ते
अदृश्य पायऱ्यांना

येईल चंद्र वेडा
वेडात भारलेला
तेजास वाढवीता
कधी तेज हारलेला

उगवे उषा पहाटे
सांजेस का निशाही
ऐसी नभास चढते
मोहकशी का नशा ही

त्याची तशी ती रूपसी
बदलून रंग येते
आभाळही भरूनी
प्रीतीत दंग होते

दि.२०/०८/२०२४
सकाळी ०९.५३ वा.



## (३३)
## आनंदाचा कोळ

कसं सांगू किती किती
विचारांचा घोळ
त्यातूनच काढावा की
आनंदाचा कोळ


उदासीच्या लहरींना
सुखाचा किनारा
दुःख कुठं गेलं शोधा
झाला का पोबारा

असे वाटे कधी कधी
उडुनिया नभी
एक व्हावे चांदणी जी
चमचम उभी

खोल खोल दाबतात
निराशेच्या दोऱ्या
तेव्हा मग खुशालच
करा मोद चोऱ्या

आता मला वाटते की
तवंग सारावा
आत मग ताजा ताजा
जीव की तारावा

दि.२१/०८/२०२४
रात्री ०८.५३ वा.



## (३४)
## चिंब ओल्या वाटेवरती

चिंब ओल्या वाटेवरती
मोती सांडलेले
बघ दवाचे थेंब चमचम
पल्लवीशी मांडलेले


स्पर्श ओले ओलीत्याचे
मेण वाटे मृत्तिका
गप्प होती जी उधाणली
काळजातून वृत्ती का

झाडे वेली डोलताना
थंड झुळुका वाहती
त्या गवतपात्या लाजुनी
प्रीतरंगी नाहती

डोकावून पाहे सविता
पावसाच्या अंगणी
इंद्रधनूच्या वाकलेल्या
त्या कमानी रंगणी

आज येतो गंध कोठून
मंद धुंद सारखा
त्या फुलांना त्या भुईला
होवो ना कधी पारखा

दि.२२/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.




**(३५)**

**बरवा श्रावण जन्मला**

मोद भरला आसमंती
तो बरसला उन्मला
मास मधु येऊन जाता
बरवा श्रावण जन्मला

फिरती मधुकर पुंजिका
वनराणीच्या अंचला
पुष्पिकांना उमलविण्या
बरवा श्रावण जन्मला

पालवीच्या तोरणाला
कोंब वेडा दंगला
रंग हिरवे ओतण्याला
बरवा श्रावण जन्मला

ऊन पाऊस पाठशिवणी
इंद्रधनुचा कुंचला
चित्र देखणे रेखण्याला
बरवा श्रावण जन्मला

नभ धरेच्या भेटण्याची
आस वाढते चंचला
मीलनाच्या सोहळ्यातून
बरवा श्रावण जन्मला

दि.२३/०८/२०२४
सकाळी ०९.३१ वा.



(३६)
## मोहनाचे वेड ते

बघ नभातून सूर येती
आसमंती बासरी
रोज उमले गोपिकेच्या
राधिका मनी हासरी

पाहता त्या सावळ्याला
तार ह्दयी छेडते
सांग ऐसे लागले का
मोहनाचे वेड ते

जाता यमुनेच्या तिरी का
तोच भेटे दामोदर
का खडा मारून जातो
घट फुटे भिजतो पदर

काज ना सुचते ग काही
तोच तो दिसतो मला
कणकणी का भास त्याचा
क्षणक्षणी भासे मला

वाटते हा जन्म सारा
पाऊली त्या वाहिला
आज मी सखये हरीला
अंतरंगी पाहिला

दि.२४/०८/२०२४
सकाळी ०७.३७ वा.



## (३७)
## कृष्णमय हो राधिका

रूप तुझे श्रीरंगा कैसे
राधेच्या हृदयातुन जैसे
अंग श्यामल सावळ्याचे
संग नीलकमल तैसे


चंद्र खुलतो रासलीले
चांदण्यातुन दंग तू
राधेच्या हृदयात वसशी
मधुर मंजु छंद तू

एकरूप नि एकजीव
मिसळुनी जातो प्रिया
एकरस होताच दंग
राधेश्याम एकचि क्रिया

वसन सारखे ताल सारखे
सूर गवसून बोलती
राधेश्यामा संगतीने
प्रीत युगुले तोलती

रंगलेल्या सांजकाळी
दंगलेल्या गोपिका
गोपही धरतात फेर नि
कृष्णमय हो राधिका

दि.२५/०८/२०२४
सकाळी ०७.२१ वा.



## (३८)
## कृष्णबाळा मोह चाळा

कृष्णबाळा मोह चाळा
रूप सुंदर गोड ते
हरखुनी जाते यशोदा
नाते आपुले अजोड ते

डोळ्यातील मोहिनी मज
खिळवुनी ठेवे सदा
जन्मला कोठे कसा पण
माय मज केलेस बा

अधर जिवनी माधुरीची
खाण मजसी लुभविते
गोड पापे किती मी घेऊ
पुण्य कोणते उभविते

गोल गोंडस चेहऱ्यावर
हास्य माधुरी जी विलसे
मोरपीस त्या जावळावर
ओठी बासरी नित बसे

ये रे ये मनमोहना
लाडक्या बाळा प्रिया
मांडीवर बसशील जरा
मज चुंबू दे तव मुखश्रिया

दि.२६/०८/२०२४
सकाळी ०५.४९ वा.
गोकुळाष्टमी



## (३९)
## श्रीहरी रे श्रीहरी

श्रीहरी रे श्रीहरी मी
होत जावे बासरी
अधरी श्वासांच्या लयीतून
पाहशी मज हासरी


मी सुरांच्या सोबतीने
तुज मनी नित राहते
सागरासम तू अथांग नि
प्रीतसरिता मी वाहते

भान ना उरते कधीही
बस तुझी होते प्रिया
लोचनांना झाकताना
रूप सुन्दर सत्क्रिया

अंग अंगा छेडताती
सूर वेणूचे तुझे
रोमहर्षी अंग फुलते
रंग मी लिंपू तुझे

सांग तू कैसे जगावे
जागलेल्या भावना
कोणते नाते हे आपुले
कोणत्या ऋणबंधना

दि.२७/०८/२०२४
सकाळी ०६.४३ वा.
गोपाळकाला, दहीहंडी उत्सव



## (४०)
## स्मरता कमला वा उमाकांत

जीर्ण राऊळाच्या पायरीवर
सूर्यरश्मित सकाळ तेजाळताना
वाटते घ्यावे आशीष आता
मनात गाभारा उजाळताना

घंटानाद घुमो पंचक्रोशीत
निनादती सूर भक्तीमय ते
पाऊले वळती आरती घुमते
अंतःकरण हे शक्तीमय ते

देवाचा निवास जुनाच प्रवास
दरवळ सुवास धूप दीपाचा
मंद गंध जाय दूर सुगंध
सूर सुरेल भजनी गीताचा

कळस उभा गावात शोभा
मंदिर जुने ते श्रद्धा न जुनी
देवाची भक्ती अध्यात्म शक्ती
खूण पटविली अनादी कुणी

रोज रोज येथे किरणं झुकती
चरणसेवेला कधी न मुकती
मुक्ती मिळाया झिजवून काया
येरझाऱ्या चौऱ्याऐंशी चुकती

यावे निवांत जरा प्रशांत
मनास करता लाटाही शांत
थांबते आस मोहाचा भास
स्मरता कमला वा उमाकांत

दि.२८/०८/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (४१)
## भरलेल्या मेघांची तोरणे

असा पाऊस मोहरून यावा
आयुष्याचा उत्सव व्हावा
थेंब कळ्या सुखाच्या बरसता
दाह पोळता विझून जावा

त्याची वाट किती मी पहावी
जीव कलिका सुकू न द्यावी
आस चातकी उरात राखत
सर अंगावरी ती झेलावी

स्पर्श शीतल गारवे धुंद
स्वप्नं उमलू पाहते मंद
मज हरीचा जडतो छंद
तीरी यमुनेच्या कृष्णगंध

आता जावे कुठे नि कशाला
वर्षा प्रीतीची हृदयी बंद
सारे करता समर्पणाला
अंतःकरणी आनंद कंद

अस्सा पाऊस दवाचा दूत
थेंब मोतीयाचे ओंजळीत
जरा थांबला दडून वेडा
हास हासत कवळ्या कळीत

फुले पावसाची वेचताना
मन ओलावून परिमळे
आठवांच्या नदीला भरते
वर शांत मनी खळखळे

एक पाऊस आत राहतो
कधी कोसळतो कधी नाही
भरलेल्या मेघांची तोरणे
थेंबपाऊस दाराशी काही

दि.२९/०८/२०२४
सकाळी ०७.४९ वा.



## (४२)
## अनुबंध मग तिथले

उसळून येती सागरात किती
लहरी अपरंपार
चंद्र पाहता चांदण्यासही
मोल चढे चंदार

फेन फेसळे लहरीसंगे
उधाणलेली रात
तशात वाटे हवी हवीशी
प्रिया तुझी रे साथ

कधी कुणाशी नाते जडते
की जुळते ऋणगाठ
सागर असला कितीही उतावीळ
संयमी तितुका काठ

पुनव रातीच्या अवखळ खोड्या
अवखळ लाटा उनाड
कितीही उठती पुन्हा त्या विरती
लहरी भाव पल्याड

असे चालती युगायुगातून
खेळ आगळे इथले
पैलतीरावर सापडतील बघ
अनुबंध मग तिथले

दि.३०/०८/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (४३)
## माहेर जिवंत अंतःकरणी

ओढ ओढते काळजास रोज
तुटते कधी ना नाते
दूर किती लाभे सासर छाया
माहेर दिलासा वाटे


जाणे न होई नेहमी बाई
तरी जवळी मनात आई
तिची ती माया वात्सल्य काया
प्रेमळ आठवे गोड अंगाई

जपते माहेरा खोल खोल किती
दडलेल्या बालपणीच्या स्मृती
क्षणाक्षणाला ताज्यातवाण्या
तराळती साऱ्या घराच्या कृती

बाबांचा आधार जीवा वाटे फार
राबणे दिनराती प्रहरी
झेलत संकटांना अलगद जपताना
मुखी नाम त्यांच्या सदा श्रीहरी

भावंडं लाडकी खेळती अंगणी
सणावारांची उत्साही पर्वणी
जीवात जीव असेल तोवरी
माहेर जिवंत अंतःकरणी

दि.३१/०८/२०२४
सकाळी ०७.५७ वा.



## (४४)
## ती शुभांगी पुष्पिका

पाहिले का गोड गुलाबी
हासणे फुलराण्यांचे
लीला परमेशाची लीली
सूर कोमल गाण्यांचे


अंग अंग कोमलांगी
ती शुभांगी पुष्पिका
कोष भरले मार्दवाचे
राहते पहा खुश ती का

एक सानू झुळुक येता
डोलते ती बोलते
आत दडल्या मूक भावा
जाणते कुणी खोल ते

उमलुनी जगणे कितीसे
सुकणे आहे ठरलेले
तरीही फुलवीत निज मनाला
सुमन अंगणी उरलेले

रंग स्पर्श नि गंध सारे
ओळखीचे वाटते
सौख्य वेडे त्या फुलांच्या
सुरभीतुन मज भेटते

दि.०१/०९/२०२४
सकाळी ०९.३८ वा.



## (४५)
## कमल ताटव्यांच्या गुलाबी

कमल ताटव्यांच्या गुलाबी
रंगी रंगून जावे ना
कमला वसते कमलकांताच्या
चरणी का पहावे ना

पंकी उमलून किंचितही ना
पंक चिकटे कमलदली
जळीच जगणे तरी अलिप्त
जळविहीना पाकळी

दूर ते कोठे फुलावे
रम्य सरोवर देखणे
चांदण्या रंगात न्हाऊन
भुईशी कुणी त्या रेखणे

अर्चनी वा पूजनी मग
पद्मिनीच्या शोभती
उमलता का सम्पदा ह्या
रोज सुंदर लाभती

वाट वेडी एकटी जी
कुमुदिनीसवे मोहवी
नित्य राहो ईश्वरी ती
लक्ष्मी मजसी गो हवी

दि.०२/०९/२०२४
सकाळी ०८.५३ वा.



## (४६)
## रानात राजा राबाया ये तर

लई लई ग्वाड ही भाकर राजा
कष्टानं कमावलेली
मातीत राबून मोत्याचं दाणं
धान्य लक्ष्मी पावलेली

वयाचं काय रं घेऊन बसलास
येळंच न्हाई बघ इचाराला
तांबडं फुटताच जगाया सुरू
डुबताच सुर्व्या निज घराला

राबता राहतोय घरात समद्या
येणारा जाणारा पै पाव्हणा
ठेचा न भाकर कांद्याची जोड
शिदोरी पोटाला खावणा

अद्यात न मध्यात कामास काम
गाळून द्यायाचा बक्कळ घाम
भेटता येता जाता देवाच्या
नावाचा गजर राम राम राम

चोळी न लुगडं कोरभर भाकर
प्यायाला पाणी मग सुखाचा ढेकर
चिंता न कसली काळजी असंल
रानात राजा राबाया ये तर

दि.०३/०९/२०२४
रात्री ११.३२ वा.



## (४७)
## वर्षाराणीचे चित्र मोहक

पाऊस भरल्या आभाळाला
सपान रंगीत पडलं
भुईवर लाजून फुलाफुलांचं
गोड गुपित हे घडलं

उमलून आल्या कळ्या कोवळ्या
रंग अंगात भरले
लाल, गुलाबी, शुभ्र नि पिवळे
पोपटी गाणे उरले


एक एकटा वृक्ष पठारी
साक्षी होत डवरला
पानोपानी त्याच्याही मग
उत्साह किती हो भरला

अंथरलेली दुशाल मऊ ती
कुसुम पायघडी होते
स्पर्श मुलायम नेत्रसुखाची
अजोड मनघडी होते

आभाळाचे बरस बरसणे
कलिका लतांचे झुलणे
सुरभीनेही मंदमंदसे
आसमंतास भुलणे

नयनांमध्ये जरा भरावे
थेंब दवाचे लोभस
चित्र असे का कुणी काढले
वर्षाराणीचे मोहक

दि.०४/०९/२०२४
सकाळी ०९.५४ वा.



## (४८)
## मंजुवेणु स्वरबंध

मी तुझ्यात समरस तू माझ्यातून
श्रीरंगा मनभावना
देह आगळे हृदय एकरूप
कुणीच घेईल ठाव ना

मिटुनी लोचना रूप देखता
आत वेगळा श्याम मिळे
राधेसंगे एकरूप जो
कृष्ण सावळा धाम मिळे

हाती बासरी सुरांच्या सरी
ओढ ही कसली वरचेवरी
जन्म कोणते आदी अनादी
मीलन कसले हे भूवरी

श्वासांमधल्या लयीत आणि
गंधामधल्या गंधी तू
तुजविण नाही अन्य गोडी मज
छंदांमधल्या छंदी तू

ही प्रीतीची रीत कोणती
कसले हे अनुबंध
ऐकू येईल युगायुगातून
मंजुवेणु स्वरबंध

दि.०५/०९/२०२४
सकाळी ०९.१२ वा.



**(४९)**

## हात कुणाचे स्वर्णिम झाले असतील

कांचनाचे ऊन पडले
पिवळाईची जादू
पीतसळी खुले पालवी
खुले जरासे वागू

बघा तृणाने पीतांबर हे
अंगावर ओढले
कुणी अंबरी किरण सोनेरी
सूर्याचे तोडले

तरुवर बसला धम्मक पिवळा
साज फुलांचा लेऊन
त्यावर अंगी शेला ओढला
रेशीम पिवळी घेऊन

कशिदाकारी कुणी काढली
पिवळ्या धाग्यांमधली
हात उन्हाचे विणकर होती
सुवर्ण धरित्री इथली

असे वाटते हात कुणाचे
स्वर्णिम झाले असतील
पराग होऊन झरतील जेंव्हा
सुमने पिवळी दिसतील

दि.०६/०९/२०२४
रात्री १०.५७ वा.



## (५०)
## ये ये गणेशा तू मंगलमूर्ती

तुझ्या आगमाची किती रे प्रतीक्षा
किती वाढवीशी मनाची तितीक्षा

कलाधिपती तू गणनायका रे
विद्यापती तू सुखदायका रे

उत्सव तुझा मन लुभावून जातो
चैतन्य ध्वज हा लहरून येतो

मोदक नि लाडू तुला पंचखाद्य
देवाधिदेव तू पूजेत आद्य

ये ये गणेशा तू मंगलमूर्ती
रे मोरया नित्य देतोस स्फूर्ती

प्रतिष्ठा तुझी प्राण फुंकून केली
लयाला तू विघ्ने नि दुरितेही नेली

सुघांधित उटी चंदनाची रुळावी
तुला केली मी प्रार्थना ती फळावी

दि. ०७/०९/२०२४
सायं. ०६.११ वा.
श्री गणेश चतुर्थी



## (५१)
## पार्वतीचा बाळ मी

अंगापेक्षा बोंगा माझा मोऽऽऽदक मोठ्ठा
शक्तिमान आहे समजू नका मला छोट्टा

पार्वतीचा बाळ मी लाडका गणेशा
म्हणतात देव सारे आदी गुणेशा

उंदरावर स्वारी माझी भराभरा फिरे
आईसाठी पृथ्वीही कमी मोल उरे

विघ्नांचा उडवतो अस्सा मी धुव्वा
संकट नाशक आहे गणु बुवा

पाहताच मोदकाला राहवत नाही
खाण्यासाठी धरेवर दहा दिस राही

केशराच्या सुगंधात खोबऱ्याचा कीस
मोदकाविना हो माझा जीव कासावीस

आलो आहे करा माझे लाड कोड खूप
गोडधोड देता देईन सुख मी अनूप

दि.०८/०९/२०२४
सकाळी ०९.४९ वा.



## (५२)
## गुणपती गणपती

गुणपती गणपती
कलापती अधिपती
द्यावी आम्हा देवा सदा
सद्बुद्धीची हो संपत्ती

आगमनाने फळाव्या
कामना ह्या साऱ्या साऱ्या
सेवा तुझी घडो देवा
चुको चोऱ्याऐन्शी फेऱ्या

प्रसादाची अन्? पूजेची
लगबग घरीदारी
आरतीचे सूर येती
मंगलाची तुझी स्वारी

व्हावे विराजित बाप्पा
हृदयाचे सिंहासन
अंतरात्म्याचा केवडा
भाव जास्वंदी आसन

मोदकाच्या नैवेद्याला
स्वीकारावे मोदे मोदे
विघ्न माझे दूर करा
जीवन भरो आमोदे

दि.०९/०९/२०२४
सकाळी ०७.४८ वा.



**(५३)**

**घ्यावी मानून सेवा माझी**

मयुरेश्वरा गणु मोरया
सुखदायका बाप्पा मोरया
आगमनाने घर आनंदून
नीीद मंगल मोरया

मोरपिसांची केली शोभा
आरासही तुज स्वागता
सुख नांदून जाते मज दारी
गणराया तू आगता

फुले फळे मोदक नि लाडू
अनारश्यांची मौज
दुर्वा रक्तपुष्पे सजली
जास्वंदाची हौस

कुणी कुणाच्या साठी साकडे
तुज सामोरी घाले
रीत पूजेची अनादिसमयी
परंपरेने चाले

घ्यावी मानून सेवा माझी
अजाण बालक म्हणुनी
तुम्हाविना ना ह्रदयमंदिरी
स्थापित आहे कोणी

दरवर्षाला येऊन गृही मज
सौख्य प्रदाता तुम्ही
विघ्ने दुरिते हरूनी घेता
तात पिता हो तुम्ही

येती सुजने प्रणाम हेतू
भेटी गाठी रम्य
आशीष घेऊन मन वाटते
प्रत्येकाच्या धन्य

दि.१०/०९/२०२४
सकाळी १०.३२ वा.



## (५४)
## महालक्ष्मी माऊली

झाला सोहळा आजचा
तुझ्या महानैवेद्याचा
काय काय देऊ तुला
जाण भाव लेकराचा

सोळा चटण्या खमंग
सोळा भाज्याही सजल्या
वडे वड्या भजे आणि
पापड कुर्वड्या वाढल्या

कढी आमटी सुवास
साखरभात मूद आली
वरणभातावर तूप
पुरणाची घाई झाली

गरमागरम पोळीशी
साजूक तुपाची घे वाटी
खीर भरडा फराळ
संगे व्यंजनांची दाटी

आता दाविते नैवेद्य
पंचप्राण आरतीला
किती नमवू मी माथा
भारतीय भारतीला

पंचारती होत आली
झाले हातवे देऊन
मंत्रपुष्पांजली म्हणू
भाव सारे एकवटून

सुवासिन ब्राह्मणांचे
तुझ्या पुढ्यात भोजन
स्नेही आप्त घेती घास
तृप्त होऊनिया जन

देते तांबूल तुला ग
मुखशुद्धी साठी माय
तुझ्या कृपेचा विडा हा
रंगू दे जीवनी काय

आता दृष्ट काढिते मी
तुझ्या राजस रूपाची
खलले काजळ माते
काजळी दिवा तुपाची

निज निज आज जरा
उद्या कहाणी सोहळा
तुझे तातू हाती बांधू
भवताली नाती मेळा

तुझी आरास पाहून
मन भरूनी पावते
सत्त्व रूप देखणे की
तुझ्या चरणी राहते

महालक्ष्मी माऊली
मी तुझ्या चरणी राहते
गौराई गौराई माय
मी तुझ्या चरणी राहते

दि.१२/०९/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (५५)
## सोन्या रूप्याच्या पाऊली

महालक्षुम्या म्हणती
कोणी गौराई म्हणती
लेकरांच्या साठी धाव
आई नावाची पणती

आला गणु तुझा इथं
आली धावत पाठीशी
माया ओढवते तुला
वात्सल्यच ग गाठीशी

ये ग ये ग माहेराला
संगे लेकुरांचा मेळा
जरा हौस होऊ दे की
माहेरवाशीणीचा खेळा

आज आलीस घराला
जीव अंथरीन स्वागताला
पायघड्या पंचप्राण
मन टांगीन झुंबराला

तुझी पाऊले रेखीन
सोन्या रूप्याच्या पाऊली
आज आलीस घराला
सुख देत तू माऊली

नवी साडी चोळी आणि
आभूषणे आरासही
फराळाची नवलाई
सुखावती का भासही

तुझ्या आवडीचे सारे
बनवीन व्यंजनांना
आगमने भोजनास
निमंत्रणे सज्जनांना

धूप दीप नि नैवेद्य
आता तांबूल घेशील
पदरात माझ्या कृपा
तुझी सकळ देशील

आऽऽरती करुनियां
दृष्ट काढते तुझी ग
झोळी फाटकी भरावी
तुझ्या कृपेने माझी ग

दि.११/०९/२०२४
पहाटे ०४.२७ वा.



सख्या गोतावळा मेळा
दर्शनास की आलाय

हौशा नवश्या बाया आल्या
कशा नटल्या सजल्या
तुला डोकावून पाहती
बाळ राणूल्या सानुल्या

तुझ्या रूपाची मोहिनी
कसं गारुड घालते
भक्ती नकळत तुझी
वाट धरून चालते

काय आणि कसे वर्णू
महालक्ष्मी तू कशी
प्रिया शंकराची गोड
गौर गौराई साजशी

तुझ्या पिलवंडावर
अशी नजर खिळते
गोड मधुर ते भाव
बाल रम्य खिदळते

तीन दिस येऊनिया
माहेरपण जगलीस
देवी असून तू कुणी
माझ्या सारखी वागलीस

ओटी भरते श्रद्धेने
पुन्हा परतून येशी
माझी दुःख दूर सारी
चिंता मिटवून देशी

हळदीकुंकवाच्या राशी
तुझे स्मित लोभसाचे
रूप विसरू मी कसे
खुलले जे तेजसाचे

दि.१३/०९/२०२४
रात्री ११.४७ वा



## (५७)
## हे गणेशा आशीषा दे

मंडपातून गणपतीच्या
दरवळे रस भक्तीचा
तू गणेशा ईश आहेस
शक्तीसवे बघ युक्तीचा

उदर भरते मोदकांनी
आवडती लाडू बहु
वाजती वाजंत्री ताशे
गर्जतीही दिशा चहू

सरळ सोंड नि भालचंद्रा
तिलक शोभे चंदनी
हार बहु तुज भूषणेही
बाळगोपाळ अंगणी

धूप दीपाच्या सुवासी
मंद गंधी धुंद तू
जपकुसुम अन रक्तपुष्पांच्या
परागी कुंद तू

घर कसे उजळून जाते
आपल्या येण्यासवे
हे गणेशा आशीषा दे
क्षणक्षणी माझ्यासवे

दि.१४/०९/२०२४
सकाळी १०.२९ वा.



## (५८)
## विघ्ने सत्वर ताराया

बहु चिंता नि काळज्यांनी
घेरलेला धूर हा
संसारातील नाना विघ्ने
झणी वाढतो पूर हा

धावा चाले गणराया तव
चालत आहे साधना
फळास येवो तुझ्या कृपेने
देवा मज आराधना

शोभा वाढवून मखरी केली
बाप्पा तुझी रे स्थापना
घडते आहे माझ्या हातून
सेवा माना ही प्रार्थना

नाम जपाचा ध्यास लागला
गणपती बाप्पा मोरया
आरती चाले पूजा चाले
मंगलमूर्ती मोरया

दहा दिसांचा उत्सव चाले
उत्साहाचा गणराया
येशी धावत भक्तजनांची
विघ्ने सत्वर ताराया

दि.१५/०९/२०२४
सकाळी ०९.३३ वा.



## (५९)
## ओंकारा आदि स्वरूपा

हे विद्येच्या देवा लिहिशील
भाग्य सुखाचे भाळी
भरून जाऊ दे तुझ्या कृपेने
आयुष्याची थाळी

महाभारता लेखन केले
विद्या चौदा अधीन तुम्हा
कला किती चौसष्ट म्हणती
अवगत असती म्हणे तुम्हा

इवले डोळे नजर पारखी
सोंड वाकडी करता सारखी
कान सुपाचे विशाल दोन्ही
ऐकून श्रुतीही सार्थ फार ती

अवखळ खोड्या गणु बाळाच्या
पार्वतीच्या मुला लाडक्या
मातृभक्त तुजसम ना होणे
एकदंत तू दातांच्या खिडक्या

बुद्धिमान तू मती प्रदाता
रिद्धी सिद्धीच्या स्वामीरूपा
तुज उत्सव हा चालत जाई
तू ओंकारा आदि स्वरूपा

दि.१६/०९/२०२४
रात्री १०.३३ वा.



## (६०)
## आशीष देतो आधी

चला निघालो आहे परतून
नको घोडे मज गाड्या
रथात कसल्या मला बसविता
मूषकवाहन उड्या

दहा दिसांचा उत्सव केला
केली तुम्ही सेवा
सोबत राहील संवत्सर मग
लाडू मोदक मेवा

रोज आरत्या ऐकुनी तृप्ती
लाड कोड जे झाले
मजला माझ्या मातेचे हो
स्मरण रोजची आले

घरी दारी जयजयकाराने
दुमदुमलेल्या नगरी
फुलाफुलांनी सजवून ठेवल्या
सुंदर तुम्ही डगरी

अनंत आहे चतुर्दशी ही
अनंत मीही अनादी
आता निघतो येईन पुन्हा
आशीष देतो आधी

दि.१७/०९/२०२४
सकाळी ०८.५० वा.



## (६१)
## हिंदोळ्यावर कधी सुखाच्या

कुठून आणीशी रंग कोवळे
पोत कोवळी लाली
नवीच येते जन्माला ही
पल्लव नवी नवाली

रेखा त्यावर स्पष्ट उमटती
नसा नसातून रस तो
वाटे भविष्याचे हे मोहक
चित्र रेखितो सरस तो

इवल्या इवल्या पानांवरती
भार भराचा असतो
ऋतू सांडती येती जाती
तरु बहराचा असतो

पुन्हा पहावे वाटे कधी जर
रूप कोवळे तान्हे
शक्यच नाही कधीही असे का
काळ न मागे जाणे

पुढे पुढे ते केवळ पुढती
मुकाट चालत रहाणे
जे जे आहे रेखांकित ते
भाळी भोगत जाणे

हिंदोळ्यावर कधी सुखाच्या
दुःख हेलकावे तर
संचित आपुले गतजन्मीचे
मानून घ्यावे ते तर

दि.१८/०९/२०२४
रात्री ०८.३७ वा.



## (६२)
## असे मुलायम कोडे पडता

कसे कोवळेपण मोजावे
कशा तलमता कोणी
फुलाफुलांच्या नाजुक राज्या
मध्ये जा राहोणी


बीज इवलुसे महाकाय
तरुवरास सामावणारे
वरवर दिसते टणक नि राकट
आत मऊपण सांभाळणारे

कोंब जो फुटतो कवळा मोही
आविष्कार मनाला
स्पर्श कोवळे दिसणे तैसे
भुरळ पडते जनाला

वाढत जाते रोप भराभर
वरवर कणखर बाणा
आत पालवी कळी फुलांची
पाकळी कवळी जाणा

त्याहून नाजूक पराग बसती
पुन्हा उत्पत्ती सार
असे मुलायम कोडे पडता
आठवतो ईश फार

दि.१९/०९/२०२४
सकाळी ०९.१६ वा.




## (६३)
## तशीच तुझी नि माझी प्रीती

शब्दप्रभू जरी तुला मी वाटे
प्रीतीमध्ये शब्द थांबती
भाव भावना आपसूक उमटून
शब्दकुसरी का खरे लांबती

नकळत मिटती लोचने दोन्ही
लज्जा तेथे प्रकटुन जाते
स्पर्श तुझे मज तनुशी होता
काया रोमांचित हो रहाते

केशही पुलकित रोम रोम मज
तुला समर्पित होऊन जातो
काय मनाचे पुसशी प्रियवरा
कणकण प्रेमाने गीत गातो

श्वास चालती लयीत तुझिया
मिसळून जाती श्वासांमध्ये
ध्यास वेगळे नुरती न माझे
मिसळून जाती ध्यासांमध्ये

जशी राधिका वेणुनादे
जन्मोजन्मी उरली आहे
तशीच तुझी नि माझी प्रीती
ईश्कृपेने स्फुरली आहे

दि.२०/०९/२०२४
सकाळी ०७.५५ वा.



(६४)
## आठव येते पाठव त्याला

उधाणलेल्या हृदयतरुवर
कलिका उमलून येती
पल्लव नसली तरीही ऋतू हे
धुंद झुलून जाती

आत असावी एक प्रेरणा
कुण्या चंद्राननेची
चरणतळाला सागर यावा
लहर उठो कामनेची

आकाशातील खुलून आल्या
ऐक चांदव्या राजा
आठव येते पाठव त्याला
दूर जो साजन माझा

येईल जवळी खुले ही कळी
लाज उमटून यावी
चांदण्यातल्या रातीमध्ये
मी त्याची होऊन जावी

गालावरती मदनलेख तो
लिहून जवळी घेईल
खुशीत तेंव्हा सुमनपाकळी
बहरुन कवळी येईल

दि.२१/०९/२०२४
सकाळी ०७.५८ वा.



## (६५)
## भारती तू जग जननी

वीणा वादन चाले निरंतर
स्वर देशी जगताला
सूर स्वामिनी तूच वाणीही
कवन तुझ्या स्वागताला

या विश्वावर अनंत करिशी
माते तू उपकार
शब्दरूप तू अर्थदायिनी
भाव तू अपरंपार

शुभ्रवसना तू धवलशारदे
विद्यादायिनी तू माते
कला कलांची अधिष्ठात्री तू
तव गुणगाना मी गाते

गायनातल्या सप्तसुरांच्या
पलिकडली तू सुराली
सर्ग निसर्ग नि सृष्टी न्हाते
अशी तुझी ग स्वराली

नाद ऐकू दे सादही तू दे
कला कलांनी कला दे
अखिल ब्रह्मांडाच्या माते
विद्या मज सकला दे

आशीष लाभून कीर्ती वाढू दे
दश दिशांस व्यापिनी
चरणतळी मज तुझ्या राहू दे
भारती तू जग जननी

दि.२२/०९/२०२४
रात्री ०८.५१ वा.



## (६६)
## गोकर्णाच्या निळ्या जांभळ्या

गोकर्णाच्या निळ्या जांभळ्या
ताज्या तवेल्या फुलांनो
वेलीवरूनी खुडले जाऊन
जरा विसावा फुलांनो

शिवलिंगावर अर्पित होण्या
उत्सुक कोमल काया
नसेल परिमळ तरीही भक्तीचा
सुगंध भरला फाया

कशास तुम्ही हिरमुसता हो
रंग किती देखणा
नसेल गंध परि प्रिय कुणा तुम्ही
स्वये शिवा देख ना

उमलून सारे जीवित व्हावे
सार्थक जर पिंडीवर
जगणे याहून असेल कैसे
सांगा हो अति सुंदर

भूतली येता कैलासाची
सफर तुम्हा लाभते
शिव सान्निध्ये जन्मच नाही
मरण सार्थ लागते

दि.२३/०९/२०२४
सकाळी ०९.२१ वा.



**(६७)**

**रंग भरून संगाने**

रंग सोनेरी मिसळून गेला
गुलाबी गुलाबातून
फुले पाकळ्या अंथरलेल्या
तुझ्या माझ्या पथातून

चालत जावे हातामध्ये
हात तुझे घेताना
स्पर्श जिव्हाळा हर्ष किती ते
दिलासेच देताना

कधी वाटते गाल गुलाबी
तुझे कुणी रंगवले
मलाच त्या तव कपोलातुनी
कुणी सांग दंगवले

ओष्ठ तुझे ते जणू पाकळ्या
कोमल मऊ सुमनाच्या
तुझ्या भावना टिपून घेईन
प्रीत भरल्या मनाच्या

आलीस माझ्या जीवनी सखे
रंग भरून संगाने
सांजही येते तुझ्या प्रीतीच्या
आठवणी अंगाने

दि.२४/०९/२०२४
सकाळी ०९.२४ वा.



## (६८)
## गुच्छ मोहिनी

गुच्छ फुलांचे म्हणू तुम्हां की
भावभावना मनीच्या
जन्मासंगे अवतरता तुम्ही
खुणा जणू गतजन्मीच्या

रंग धवल कधी रंग निराळे
आकाशाशी भिडणारे
परागतंतू जणू कामना
अवकाशातून उडणारे

बीज कोठले संचित ठरते
भूमिखाली कर्माच्या
फलित होऊनी भोग भोगणे
कर्तव्याच्या धर्माच्या

गतकाळाची भूमी होईल
आधाराला पायाशी
कर्म रेखणे वर्तमान जो
भविष्य घडे आकाशाशी

सारे सारे परस्परांशी
जुळले जातील अफलातून
गुच्छ मोहिनी जीवन ठरतील
सुगंध पसरून मग आतून

दि.२५/०९/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



(६९)

## एक मन हरवून जाता

आज कोठे थांबले हे
मन मला कळलेच नाही
का असे घडले की त्याने
थोडेही छळलेच नाही

शांत होते बैसले ते
हृदय कोपऱ्यातून कसे
शहाणे झाले मूल वागे
तेही अगदी मग तसे

हट्ट नाही कोणतेही
कोणत्या ना मागण्या
दुःख झाले म्हणून नाही
देत बसले डागण्या

शब्दही ना बोलले ते
मौन होते सारखे
मनच झाले आज माझ्या
का मनासी पारखे

वाटले माझे मला हे
नाही वागणे चांगले
एक मन हरवून जाता
जीवनच मज पांगले

दि.२६/०९/२०२४
सकाळी ०८.३३ वा.



## (७०)
## भाळणे भाव पाळणे

आता तुला सांगायचे ते
सांगणे होईल का
शब्दही ना बोलता मी
मन कळून येईल का

तू न दिसशी तर मनाशी
घेरते माझ्या उदासी
अंतरातून सूर निघती
पाहते तर तूच गाशी

तू जरी काहीच मजला
सांगशील नाही कधी
ओळखून घेईन तुझिया
घालमेलीला आधी

बोलतील नयनातल्या त्या
भावना माझ्या तुला
घे जरा समजून नाजूक
सुमन मन माझ्या फुला

भाळणे भाव पाळणे
सांभाळणे एकदूसऱ्या
साथ ऐशी देऊ सखया
जखमा भरतील दूखऱ्या

दि.२७/०९/२०२४
सकाळी ०८.२८ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.
  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप–स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती–आकाश), लाघव वेळा (सकाळ–संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती–आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना (मिश्र कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये ‘मंजु मंजिरी’ आणि ‘सर्ग निसर्ग’ नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(मिश्र कविता) - मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवीनवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, दरवळ तुझे नि माझे, लोभसवाणी, (मन) मनमनुल्या, वेध

मनाचा, शब्द पाखरा, मन मोहरून माझे, (अध्यात्म) - निरव नमन, (जीवनपर) - क्षणांचं देण, आयुष्याचं गाव, (फुल) - फुललेलं मौन, (निसर्ग) - सुख सुखाचं, पानापानातली कथा, (प्रीत त्याची तिच्यासाठी) - स्पंदन रेषा, (सुख-दुःख) - सुखाचा किनारा, (नानी) - थांब जरा तू, (गंध-सुगंध) - दूर त्या तिथे, आनंद गंधपाणी, (स्त्री जीवन) उडण्या हे आभाळ, संस्कृत बालगीत संग्रह - बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद - त्रिसहस्रसीवनम्, सुधीर शास्त्री यांचा मराठी काव्य संग्रह 'मनुष्य' या पुस्तकाचा संस्कृत अनुवाद - मनुष्यः, शब्द तुझ्या नावाचे, घडते नवेच काही.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष -**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२-२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान - २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार - २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर - ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919 8id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १000 पेक्षा जास्त
- प्रवचने : ५00 हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १00 हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १0३
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : २९
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४0
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २00 हून अधिक
- पुरस्कार : २00 पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : 0५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : 0४

• • •